वेणूताई चव्हाण कॉलेज,कराड

अहवाल: रक्तदान शिबिर, शनिवार, दि. 27 जुलै, 2024

श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराडचे अध्यक्ष मा. आमदार श्री. बाळासाहेब पाटीलसाहेब (माजी सहकार व पणनमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, सातारा जिल्हा) यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार, दि. 27 जुलै, 2024 रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराडचे वेणूताई चव्हाण कॉलेज,कराड व यशवंतराव चव्हाण रक्तपेढी, कराड आणि लायन्स क्लब ऑफ कराड यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्या महाविद्यालयात करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराडचे जनरल सेक्रेटरी मा. श्री. अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्लासाहेब यांच्या शुभहस्ते झाले. तसेच संस्थेचे विश्वस्त व सदस्य मा. श्री. अरुण पांडुरंग पाटील (काका), मा. भास्करराव कुलकर्णी (दादा), यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराडचे प्राचार्य डॉ. एस. बी. केंगार, सैदापूरचे सरपंच मा.श्री फतेसिंह जाधव, उपसरपंच मा.श्री अनिल जाधव, प्रगतशील शेतकरी मा.श्री प्रमोद जाधव व वडोली निळेश्वरच्या माजी सरपंच श्रीमती संगीता डुबल, यशवंतराव चव्हाण रक्तपेढी, कराडचे डॉ. संदीप यादव व सहकारी तसेच लायन्स क्लब ऑफ कराडचे अध्यक्ष श्री. जितेंद्र ओसवाल, ॲड. विराग जांभळे व सहकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

शिबिरास श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, कराडचे अध्यक्ष मा.श्री जयंत पाटील (काका), युवा नेते तथा सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि. यशवंतनगर, कराडचे संचालक, मा.श्री जशराज पाटील (बाबा), तसेच विश्वस्त व खजिनदार मा.श्री संजय बदियानी, विश्वस्त व सदस्य मा.श्री नंदकुमार बटाणे, मा.श्री.शंकरराव खापे (बापू) इत्यादी मान्यवरांनी भेट दिली.

या शिबिरासाठी प्रभारी प्राचार्य प्रा. (डॉ.) श्रीमती एस.आर.सरोदे यांनी आवाहन केल्याप्रमाणे बहुसंख्य रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिर उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. (डॉ.) आर. आर. थोरात यांनी केले. आभार प्रा. श्रीमती पी. एस. सादिगले यांनी केले. व सूत्रसंचालन प्रा. श्रीमती एस. डी. पाटील, डॉ. एन. एस. देसाई यांनी केले. शिबिरातील रक्तदान केलेल्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तूचे वितरण करण्यात आले. या शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कराड परिसरातील ग्रामस्थ बहुसंख्येने सहभागी झाले होते.

VENUTAI CHAVAN COLLEGE, KARAD Estd. 1st May 1971

कार्यक्रमाची काही क्षणचित्रे










VENUTAI CHAVAN COLLEGE, KARAD
Estd.
1st May 1971